स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र या विषयातील (पीएच.डी.)पदवीसाठी
सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

आदिवासीच्या सामाजिक आर्थिक विकासात निवडक शासकीय योजनाचे योगदान (विशेष संदर्भ: हिंगोली जिल्हा)

संशोधक

भिसे मारोती शंकर

(एम.ए, बीएड, एम.एड)

मार्गदर्शक

डॉ. बोनर. आर. वाय.

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव. ता. गंगाखेड, जि. परभणी.

संशोधन केंद्र

स्वा. रा. ती .म. विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर - 2022

आदिवासीच्या सामाजिक आर्थिक विकासात निवडक शासकीय योजनाचे योगदान (विशेष संदर्भ: हिंगोली जिल्हा)

प्रस्तावना:-

आदिवासी समाज हा भारतात सर्वच राज्यात मोठ्या प्रमाणात राहतो. भारतातच नव्हे तर जगाती प्रमुख देशात जसे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका खंडात आदिवासी राहतात. विशेषतः आफ्रिका खंडात सर्वात जास्त आदिवासी आहे. भारतात आदिवासींना 'मूळनिवासी' म्हणूनही ओळखले जाते. तसेच त्यांना पूर्वीपासून राहत असलेले लोक म्हणजेच आदिवासी अशी सुद्धा ओळख आहे.

भारतीय संविधानाच्या कलम 46 नुसार अनुसूचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हिताला चालना व शोषणापासून संरक्षण करण्यासाठी तरतुदी केलेल्या आहेत. संविधानाच्या कलम 275 नुसार ज्या राज्यांना आर्थिक सहाय्याची गरज आहे. अशा राज्यांना अनुदान देण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे. राज्यातील अनुसूचित क्षेत्राच्या प्रशासनाचा स्तर उंचावण्यासाठी विशेष अनुदान देण्याची तरतूद घटनेत आहे.

आदिवासी समाजा हा मुख्य प्रवाहापासून खूप दूर आहे. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विशेष योजना राबवल्या जातात. शासनाचा उद्देश आदिवासी समाजाचा विकास

घडवून आणणे हा आहे. तरीसुद्धा आदिवासी समाजाचा विकास अपेक्षित प्रमाणात झालेला नाही.

सन 2011 च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासींची लोकसंख्या 10 कोटीच्या वर आहे. महाराष्ट्राची आदिवासी लोकसंख्या एक कोटी पेक्षा जास्त आहे. हे प्रमाण राज्याच्या लोकसंख्येच्या तुलनेत 9.35% इतकी आहे. भारतात आदिवासी जमाती संख्या 427 आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातीची संख्या 45 आहे. त्यात प्रामुख्याने अंध, भिल्ल, कोलाम, कातकरी, पावरा, वारली, पारधी, इत्यादी या जमाती आढळून येतात.

आदिवासी समाजाची ओळख:-

आदिवासी समाज हा बऱ्याच ठिकाणी आढळून येतो. जगात आदिवासीची संख्या ही आफ्रिका खंडा नंतर भारतात दोन क्रमाकावर आढळते. जगात त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. जसे अमेरिकेत रेड इंडियन्स, ऑस्ट्रेलियात अबिरिजन्स व आफ्रिका आदिवासी

भारतीय संविधानानुसार भारतातील आदिवासी जमातींना 'अनुसूचित जमाती' म्हणून ओळखली जाते. आदिवासी समाज हा नागरी संस्कृती पासून दूर आहे. आदिवासी समाज जंगल, दर्या-खोऱ्यात राहणारा आहे. आदिवासी समाज वृक्ष, प्राणी यांना देव मानतो.

हिगोली जिल्हयात अंध ही जमात मोठ्या प्रमाणात आढळून येते. या अंध जमातीचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतीचे अल्प प्रमाण असल्यामुळे दारिद्र्य मोठ्या प्रमाणात आहे.

1.2 आदिवासीच्या योजनाची संकल्पना :-

आदिवासी समाज मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विकास यीजना राबविण्यात येतात. जसे की इंदिरा आवास योजना, ठिबक सिंचन योजना, शबरी घरकुल योजना. इत्यादी.

1.3 संशोधन समस्या:-

शिक्षणाचा अभाव, वाहतुकीच्या गैरसोयी, अस्वच्छ पाणी, शोषण, वेठबिगारी, अज्ञान, अंधश्रद्धा, आरोग्याच्या सुविधाचा अभाव, व्यसनाधीनता, दारिद्र्य, बेकारी इत्यादी समस्यानी आदिवासी समाज ग्रासलेला आहे. या विविध समस्या सोडविण्यासाठी आदिवासी विकास विभाग तसेच जिल्हा परिषदेमार्फत विशेष योजना राबविल्या जातात.

3. संशोधन विषयाची निवड :-

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विशेष योजना व प्रयत्न केले जात आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीपासून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा पर्यंत शासकीय पातळीवर प्रयत्न करुनही आज आदिवासी समाज देशाच्या मुख्य प्रवाहाशी पुराणत: जोडला गेला नाही. याच्या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. आदिवासींना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काय उपाययोजना करण्याता येऊ शकतात. यांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत विषयाची अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

4. संशोधनाची उद्‍दिष्टे :-

प्रस्तुत विषयाचा अभ्यास खालील उद्‍दिष्टे समोर ठेवून करण्यात येणार आहे.

1) हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
2) हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
3) हिंगोली जिल्हयात केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास योजनांचा अभ्यास करणे.
4) शासनाच्या योजनांचा आदिवासी समाजाला किती प्रमाणात लाभ मिळतो याचा अभ्यास करणे.
5) आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक मागासलेपणाची कारणे शोधून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उपाय सुचविणे.

5. संशोधनाची गृहीतके :-

प्रस्तुत संशोधन पुढील गृहीतके गृहीत धरुन करण्यात येणार आहे.

1) हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाज सामाजिक दृष्टिया मागासलेला आहे.
2) हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाज आर्थिक दृष्टिया मागासलेला आहे.
3) केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास योजना अपुऱ्या आहेत.

4) हिंगोली जिल्ह्यातील केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास योजनांचा आदिवासींना लाभ होतो.
5) आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहा पासून दूर आहे.

6. संशोधन भौगोलिक क्षेत्र :-

संशोधन क्षेत्र म्हणून हिंगोली जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक क्षेत्रफळ 4526 चौरस किलोमीटर आहे. या जिल्ह्यात एकूण पाच तालुके आहेत. यामध्ये कळमनुरी, वसमत, सेनगाव, औंढा, हिंगोली या तालुक्याचा समावेश होतो.

हिंगोली जिल्ह्याचे वैशिष्ट्य म्हणजे हा जिल्हा मराठवाडा विभागाच्या उत्तरेस आहे. जिल्ह्याला एकूण पाच जिल्ह्याची सीमा लागून आहे. हिंगोली जिल्ह्याची स्थापना ही 1 मे 1999 साली झाली. हा जिल्हा औरंगाबाद प्रशासकीय विभागात येतो. या जिल्ह्याच्या लोकसंख्याची घनता ही 260 प्रति चौरस किलोमीटर असून साक्षरता दर हा 76.04% एवढा आहे.

हिंगोली जिल्ह्यातून कयाधू, पैनगंगा, पूर्णा या तीन महत्त्वपूर्ण नद्या वाहतात. हे शहर कयाधू नदीवर वसलेले आहे

7. संशोधनाचा कालावधी :-

प्रस्तुत विषयात संशोधनासाठी सन (2010 ते 2020) या दहा वर्षाचा कालावधी निवडला जाईल. या कालावधीत हिंगोली जिल्ह्यातील

आदिवासी समाजातील लाभार्थ्याची माहिती आकडेवारी स्वरूपात संकलित केली जाणार आहे.

8. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाज असलेल्या सर्व तालुक्यातील गावाची नमुना निवड करून महिती संकलित केली जाणार आहे सदरील संशोधन सन 2010-11 ते 2020-21 असे दहा वर्षाच्या माहिती वर आधारलेले आहे.

आदिवासी समाज देशातील सर्वच राज्यात व महाराष्ट्रातील सर्वच जिल्यात कमी अधिक प्रमाणात आहे.परंतु प्रस्तुत संशोधन हिंगोली जिल्ह्या पुरतेच मर्यादित आहे.प्राधान्यांना अभ्यास केला जाईल व संशोधनाची मर्यादा ही हिंगोली जिल्हा पुरतीच राहील.

9. नमुना निवड पद्धती :-

सदर संशोधनासाठी बहुस्तरीय नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. नमुना निवडी साठी यादृच्छिक नमुना निवडी पद्धती च्या सहयाने एकुण विश्वाच्या 10 % नमुन्याची निवड करण्यात येणार आहे.

10. संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम तथ्यच्या सहाय्याने तथ्याचे संकलन करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :-

संशोधनात प्राथमिक स्त्रोतात मुलाखती, निरीक्षण, प्रश्नावली अनुसूची या स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

द्वितीय स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्रकाशित शोध प्रबंध, अप्रकाशित शोध प्रबंध, संदर्भ ग्रंथ, दैनंदिनी ,पत्रे, संशोधन अहवाल, शासकीय गॅजेटियर, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, आयोग आदिवासी विकास विभागांचे अहवाल, अंदाजपत्रके, हिशेब तपासणी अहवाल, इंटरनेटचाही वापर करण्यात येईल.

11. तथ्यावरील प्रक्रिया :-

प्रस्तुत संशोधनात सकलीत केलेल्या माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी मध्य, सरासरी, प्रमाण विचलन व सहसंबंधअशा सांखिकी शाधनाचा उपयोग करण्यात येणार आहे.

तथ्य प्रक्रिया करताना वर्गीकरण करणे, संपादन करणे, सांकेतीकरण, आलेख, सारणीकरण करण्यात येईल.

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रकरण पहिले :- प्रस्तावना आदिवासी समाजाची ओळख आदिवासी समाजाची संकल्पना, संशोधन मांडणी, संशोधन विषयाची निवड, उद्दिष्टे,गृहीतके .

प्रकरण दुसरे :- संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे :- हिंगोली जिल्ह्याची अर्थव्यवस्था.

प्रकरण चौथे :- हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती.

प्रकरण पाचवे :- हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी विकास योजना व आदिवासींचा विकास यांच्यातील सहसंबंध.

प्रकरण सहावे :- सारांश निष्कर्ष आणि शिफारशी.

संदर्भसूची :-

1) डॉ प्रदीप आगलावे. संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे. (श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर) 2016
2) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा हिंगोली (विविध अंक)
3) राजेश धनजकर. अंध जमात शोध आणि बोध. (अनुराधा पब्लिकेशन, नांदेड).2012
4) आदिवासी विकास विभाग उपयोजना. (2018-19)
5) डॉ. संतोष खिराडे, जयश्री पाटील.- संशोधन पद्धती व संशोधन प्रकाशनाचे नीती तत्वे.(प्रशांत पब्लिकेशन, जळगांव) 2021
6) Wikipedia
7) www.tribalMaharashtra.gov.in
8) www.hingoli.gov.in

संशोधक | **मार्गदर्शक**

भिसे मारोती शंकर

डॉ . बोनर . आर . वाय.

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविृयालय,

राणीसावरगाव, ता. गंगाखेड जिल्हा. परभणी